अ
५६५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/८८५/२०१९
दिनांक : १९/०९/२०१९

**"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे.सोनाई दादा कंन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. ०५/०५/२०१५ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि.०३/०५/२०१६ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण ४६ झोपडीधारकांपैकी असून त्यापैकी पात्र निवासी ३८, पात्र बिगर निवासी ०१ असे एकुण ३९ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. ४६ झोपडीधारकांपैकी ३५ झोपडीधारकांनी म्हणजेच एकूण ९९.९९% झोपडीधारकांनी मे.सोनाई दादा कंन्स्ट्रक्शन यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे क्षेत्रिय अधिकारी, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल सादर केला आहे. तसेच कार्यालयीन परिपत्रक क्र.२१५ दि.०१/०७/२०१७ मधील कार्यपद्धतीनुसार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क.१ यांनी प्रत्यक्ष जागेवर दि.१५/०७/२०१७ रोजी स्थळपाहणी केली असून त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.सदर दोन्ही अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे;

आणि ज्याअर्थी ;महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे तरतूदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ व मुळ अधिनियमातील ३(क) चे तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पूर्वसुचना, महाराष्ट्र शासन राजपत्र पृष्ठ क्र.१० व ११ वर प्रसिध्द करणेत आले. तसेच दै.मुंबई चौफेर येथे दि.१२/०२/२०१९ रोजी प्रसिध्द केले असून त्यास योजनाक्षेत्रातही प्रसिध्दी देणेत आली आहे. तसेच विकसक मे.सोनाई दादा कंन्स्ट्रक्शन व मा.जिल्हाधिकारी पुणे जिल्हा, पुणे यांना सदरची नोटीस बजावण्यात आली आहे. सदर बाबतीत ३० दिवसांच्या (दि.१५/०३/२०१९ अखेर) विहित मुदतीत सुचना / हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अनुसुचिमध्ये निर्दिष्ठ क्षेत्र उक्त कलमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३क (१) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.सदरचे घोषित पुनर्वसन क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क(१) व झोपुप्रा पुणे चे नियमावलीतील SR १९(१) मधील तरतूदीनुसार विकसित केले जाईल;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (२) मधील तरतूदीनुसार शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ येथे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.११७९ | ३५.९० | **पुर्वेस** - सि.स.नं. ११५८ व ११५९, नाना पेठ | मे.सोनाई दादा कंन्स्ट्रक्शन, ओम सोसायटी, पहिला मजला, ३६ नाना पेठ, पुणे-२ |
| सि.स.नं.११८० | ३१.३३ | **पश्चिमेस** - सि.स.नं. ११७८ व ११७७, नाना पेठ | |
| सि.स.नं.११८१ | ५९.४२ | **उत्तरेस** - सि. स. न. ११४ नाना पेठ | |
| सि.स.नं.११८२ | १५.९२ | **दक्षिणेस** - सि. स. न. ११६७ नाना पेठ | |
| सि.स.नं.११८४ | ५६.६० | | |
| बिना नंबरचे भुखंड, चमडेगल्ली, नाना पेठ, पुणे | ५४२.९३ | | |
| **एकुण क्षेत्र** | **७४२.१०** | | |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

19.9.2019

(राजेंद्र निंबाळकर)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -१९/०९/२०१९

प्रत - १) मा.जिल्हाधिकारी, जिल्हा पुणे, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२) मे.सोनाई दादा कंन्स्ट्रक्शन, ओम सोसायटी, पहिला मजला, ३६ नाना पेठ, पुणे-२ यांना माहितीस्तव.

६८८

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/मा.क्र.२१५/शुद्धीपत्रक/२७५/२०२४
दिनांक :०५/०३/२०२४.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे**

क्रमांक झोपूप्रा/सप्रा-१/शुद्धीपत्रक/०७ /२०२४

उपरोक्त विषयांकित मिळकतीबाबत तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेकडील सि.स.नं.११७९, ११८०, ११८१, ११८२ व ११८४ चमडे गल्ली, नाना पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने संदर्भात ७४२.१० चौ. मी. क्षेत्राकरीता झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमाच्या कलम ३ क नुसार अंतिम आदेश दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजी निर्गमित केला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ३ - ९, २०१९ रोजी पुष्ठ ३१ व ३२ वर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. नगर भुमापन अधिकारी क्र.०२ यांचेकडील जा.क्र. न.भु.अ.२/ प.भु.७/ झोपूप्रापु/ ५७८/ २०२२, दि.३०/०६/२०२२ रोजीचे पत्रानुसार सि.स.नं. ११७८ याचे क्षेत्र ३१.८० चौ. मी. असून प्रत्यक्ष जागेवर मोजणी नकाशाआधारे ५४९.३० चौ. मी. दिसून येते असे नमूद केले आहे.

त्यानुसार, संदर्भीय आदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती आवश्यकता आहे अशी माझी धारणा आहे. सबब, सि.स.नं.११७९, ११८०, ११८१, ११८२ व ११८४ चमडे गल्ली, नाना पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन आदेशनुसार निर्धारित केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**या ऐवजी**

दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे घोषित झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र.

| सि. स. नं | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|
| ११७९ | ३५.९० |
| ११८० | ३१.३३ |
| ११८१ | ५९.४२ |
| ११८२ | १५.९२ |
| ११८४ | ५६.६० |
| विना नंबरचा भुखंड | ५४२.९३ |
| **एकूण क्षेत्र** | **७४२.१०** |

**असे वाचावे**

नगर भुमापन अधिकारी क्र.०२ यांचेकडील जा.क्र. न.भु.अ.२/ प.भु.७/ झोपूप्रापु/५७८/ २०२२, दि.३०/०६/२०२२ रोजीचे पत्रानुसार सुधारीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र

| सि. स. नं | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|
| ११७९ | ३५.९० |
| ११८० | ३१.३३ |
| ११८१ | ५९.४२ |
| ११८२ | १५.९२ |
| ११८४ | ५६.६० |
| ११७८ | ५४९.३० |
| **एकूण क्षेत्र** | **७४८.४७** |

स्थळ :- पुणे.
दिनांक :- ०५/०३ /२०२४.

२९.२.२४

**नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.